RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १३८(१०)] गुरुवार, नोव्हेंबर ३, २०२२/कार्तिक १२, शके १९४४ [पृष्ठ २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४०८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ नोव्हेंबर २०२२.

**आदेश**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक पोलीस-११२२/प्र.क्र.२२ /पोल-५ अ.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (तिसरी सुधारणा) नियम, २०२२, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ याच्या नियम ३ मध्ये, पोट-नियम (१) मधील खंड (अ) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल : —

" परंतु, कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगामुळे, १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२२ या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवर्गांचे उमेदवार, निवडीद्वारे उक्त पदांसाठी सन २०२० व २०२१ या कॅलेंडर वर्षातील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात यावयाच्या भरती प्रक्रियेसाठी, एक वेळची उपाययोजना म्हणून, पात्र असतील. ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**अ. ए. कुलकर्णी,**
शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 03 November 2022.

*ORDER*

MAHARASHTRA POLICE ACT.

No. POLICE-1122/C.R.22/POL-5A.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Third Amendment) Rules, 2022.

2. In rule 3 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, in sub-rule (1), in clause (A), the following proviso shall be added, namely :—

" Provided that, due to Covid - 19 pandemic, the candidates of all categories who have crossed the upper age limit during the period 1st January 2020 to 31st December 2022 shall be eligible for recruitment process to be conducted for filling up vacancies of the calendar year 2020 and 2021 for the said post by selection, as a one-time measure.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. E. KULKARNI,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.